# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १०४ वा गुरूवार दि.२६ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## श्रद्धा, सबुरी आणि निष्ठा असेल तरच जनतेची सेवा करू शकू

### आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी तरुणांशी साधला संवाद; 'युवर व्हाईस, युवर चॉईस' कार्यक्रमाला तरुणाईची गर्दी

लातूर /प्रतिनिधी राजकारणात येणाऱ्या युवकांनी श्रद्धा, सबुरी व विचारावर निष्ठा ठेवावी लागेल . तरच आपण जनतेची सेवा करू शकू. लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्याकडून आम्हाला ही मुल्ये मिळाली. आम्ही त्यांच्याकडे पाहून ती शिकलो, असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केले. दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात नॅशनल स्टुडंटस् युनियन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित 'युवर व्हाईस, युवर चॉईस' कार्यक्रमात आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी महाविद्यालयीन युवक – युवतींशी मंगळवारी संवाद साधला. त्यांच्या मनातील प्रश्न जाणून घेतले. यावेळी सौ. दीपशिखा धिरज देशमुख, दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गायकवाड व शिक्षक, एनएसयुआयचे पदाधिकारी व महाविद्यालयीन विद्यार्थी – विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदक बालाजी सूळ यांनी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची यावेळी मुलाखत घेतली.






आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले, झपाट्याने तंत्रज्ञान बदलत आहे. त्यामुळे नोकऱ्या कमी झाल्या आहेत . एआयचे शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले तर त्यांना रोजगार प्राप्त करता येईल. तशी व्यवस्था निर्माण करावी लागेल. नव्या तंत्रज्ञानावर आधारित रोजगार उपलब्ध करावा लागेल. मांजरा परिवार आणि लातूर जिल्हा बँकेने १०० हार्वेस्टरच्या माध्यमातून जवळपास ४ हजार प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध केला आहे. तर देश– विदेशातील विद्यार्थी येथे शिकायला येतील ! लातूर पॅटर्न आता विशिष्ट टप्प्यांवर पोहचला आहे. त्यांमुळे लातूर एज्युकेशन हब झाले पाहिजे, कॅम्पस निर्माण झाले पाहिजे . तेव्हा देश– विदेशातील विद्यार्थी येथे शिकायला येतील. या दृष्टीने विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणारी सर्वांगीण व्यवस्था येथे निर्माण करावी लागेल, असेही ते म्हणाले. लातूरला. मराठवाडयाला पश्चिम वाहिनी नद्यांचे वाहून जाणारे पाणी वळवावे लागेल. यातून पाण्याचा प्रश्न मिटेल, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

परीक्षेतील वाढते गैरप्रकार चिंताजनक परीक्षांमध्ये गैरप्रकार वाढत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यांचे नुकसान होत आहे . शिक्षण व नोकरी देणे ही सरकारची जबाबदारी आहे . विद्यार्थी वर्षभर मेहनत घेतात. पण त्या मेहनतीला परीक्षा न घेतल्यामुळे किंवा परीक्षेतील गैरप्रकारांमुळे काही अर्थ राहत नाही. याबाबत मी सभागृहात बोललो आहे. प्रश्न उपस्थित केले आहेत. कॉग्रेस पक्षानेही नेहमी विद्यार्थीहिताची भूमिका घेतलेली आहे. परीक्षा सुरळीतपणे राबविण्यासाठी, व्यवस्था सुधारण्यासाठी आमचा वेळोवळी पाठपुरावा सुरू आहे, असे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.

## मुरुडमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून मदत द्या

### लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांची मागणी

लातूर / प्रतिनिधी मुरुड (ता. लातूर) येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने काढणीला आलेल्या सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्याचे, घरांचे, बाजारपेठेतील दुकानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी बुधवारी केली. मुरुड येथे मंगळवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे अतोनात नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले.

मूरुड (ता. लातूर) मध्ये ढगफुटी झाल्यामुळे अनेक नागरिक पूरग्रस्त झाले. आपल्या आपत्ती व्यवस्थापनाच्या टीमने तात्काळ कार्यरत होऊन पूरग्रस्तांची सुटका करून त्यांची मंदिरामध्ये व्यवस्था केली. याबद्दल आपत्ती व्यवस्थापनाच्या चमुचे अभिनंदन करतो. अचानक आलेल्या पुराच्या पाण्यामुळे अनेक नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य, घरांचे तसेच बाजारपेठेतील दुकानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सर्वतोपरी मदत करावी. येथील शेतकऱ्यांचे काढणी योग्य सोयाबीनचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करण्याबाबत संबंधित महसूल व विमा कंपनी यांच्या यंत्रणांना सूचित करून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.



## जगविख्यात मेडिकल स्कूलच्या शिक्षकांनी लिहिलेल्या पुस्तकाला डॉ. बी. एस.नागोबा यांची प्रस्तावना

लातूर :– आंतरराष्ट्रीय स्तरावरील जगविख्यात मेडिकल स्कूलच्या शिक्षकांनी लिहिलेल्या बेसिक इम्यूनोलॉजी या पुस्तकाची प्रस्तावना लातूर येथील एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा यांनी लिहिली असून जागतिक स्तरावरील पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची संधी मिळणे ही अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे या कार्याबद्दल डॉ. नागोबा यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालय लातूर चे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील समर्पित शोधकार्य व संशोधनाची दखल घेवून त्यांना कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी, सॅनफ्रान्सिस्को येथील पॅथॉलॉजीचे एमेरिटस प्रोफेसर डॉ. अबुलके. अब्बास, हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या पॅथॉलॉजीचे प्राध्यापक डॉ. अँड्रयूलिचमन आणि हार्वर्ड मेडिकल स्कूलचे मेडिसिनचे प्राध्यापक डॉ. शिवपिल्ळई यांनी लिहिलेल्या बेसिकइम्यूनोलॉजी या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. नागोबा यांच्या प्रस्तावनेसह या पुस्तकाचे प्रकाशन सप्टेंबर २०२४ मध्ये करण्यात आला. जागतिकक्रमवारीतहार्वर्ड मेडिकल स्कूल पहिल्या आणि कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी मेडिकल स्कूल नवव्या क्रमांकावर आहे. जगविख्यात मेडिकल स्कूलच्या शिक्षकांनी लिहिलेल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यासाठी संधी मिळणे ही अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे.



डॉ. नागोबा यांचे एकूण २१९ संशोधनपर लेख प्रसिध्द झाले असून त्यापैकी ९९ लेख हे वेगवेगळया आंतरराष्ट्रीय वैद्यकीय जर्नल्समधून प्रसिध्द झालेले आहेत. त्यांनी आतापर्यंत वैद्यकीय अभ्यासक्रमावर एकूण २० पुस्तके लिहीली असून पैकी चार आंतरराष्ट्रीय प्रकाशकाकडून प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. यापैकी एक पुस्तक चीन मध्ये एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी संदर्भग्रंथ म्हणून वापरले जाते. त्याच प्रमाणे त्यांना आजपर्यंत २४ पुरस्कार मिळाले असून पैकी ९ आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत.

डॉ. नागोबा यांच्या या यशाबद्दल माईर्स एम.आय.टी. चे संस्थापकीय अध्यक्ष प्रा. डॉ. वि. दा. कराड सर, कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त प्रा. राहूल कराड, एम.आय.एम. एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक आ. श्री. रमेशअप्पा कराड, श्री. पृथ्वीराज कराड,कॅम्पस समन्वयक, अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, डॉ. सरिता मंत्री, डॉ. अरूणकुमार राव, डॉ. बी. एस. वारद, डॉ. बी. डी. आडगावकर, डॉ. चंद्रकला डावळे, डॉ. अजय गावकरे, डॉ. अभिजीत रायते,डॉ. सचिन भावठाणकर, डॉ. पी. बी .केंद्रे, विनोद जोगदंड, विश्वनाथ माने, दिपक बदने व इतरांनी अभिनंदन केले.

## भिसे वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी मिळाल्याने अनेक गावच्या नागरिकांनी आ. कराड यांचे मानले आभार

लातूर :– राज्यातील महायुती शासनाकडे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी मिळून घेतल्याबद्दल भिसे वाघोली आणि त्या परिसरातील विविध गावच्या नागरिकांनी बुधवारी लातूर येथील संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

गेल्या अनेक वर्षापासून मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित व्हावे अशी मागणी त्या भागातील नागरिकांची होती. जनतेच्या मागणीची दखल घेऊन आणि ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात यासाठी यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्यातील महायुत शासनाच्या संबंधित मंत्री महोदयाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्य शासनाने भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी दिली. भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाल्याने भिसे वाघोली सह आजूबाजूच्या अनेक गावातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सदरील आरोग्य केंद्र मंजूर व्हावे यासाठी विशेष प्रयत्न करून मंजुरी मिळवून घेतल्याबद्दल





भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भिसे वाघोली यासह भोसा, वाडीवाघोली, निळकंठ, शिराळा, येळी, पिंपरीआंबा, माटेफळ, करकटा, खुंटेफळ, बोरगाव, हिसोरी, खंडाळा, गाधवड, बोडका आदी गावातील नागरिकांनी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संभाजी वायाळ यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थित विविध गावच्या नागरिकास समवेत आ. कराड यांनी संवाद साधून भिसे वाघोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र माझ्याच हातून व्हावे ही नियतीची इच्छा होती असे सांगून विविध गावच्या विकास कामाबाबत सविस्तर चर्चा केली.

यावेळी भैरवनाथ पिसाळ, चंद्रकांत वांगस्कर, आण्णासाहेब पाटील, बाबा भिसे, हमीद पठाण, बालासाहेब कदम, लालासाहेब पाटील, शुभम खोसे, बापू देवकर, अशोक सावंत, जीवन हजारे, अशोक पाटील, हकीम सय्यद, गोपाळ काळे, पाखरे, अंकुश बनसोडे, बाळासाहेब मादळे, शमशोधन सय्यद, सुधाकर वायाळ, दादासाहेब वायाळ, काकासाहेब पाटील, साहेबराव मुळे, बालाजी नाईकवाडे, बालाजी गवळी, संजय सूर्यवंशी, काकासाहेब भिसे, चित्रांगण भिसे, बाळासाहेब भिसे, आप्पासाहेब पाटील, शिवाजी निलंगे, बालाजी निलंगे, दिलीप भिसे, अनिल हंडीबाग, सिद्दिक सय्यद, रामू वायाळ, विजयकुमार वायाळ, जमील शेख, दत्ता गायकवाड, गौरीशंकर धुमाळ, दत्ता मांदळे, प्रकाश मांदळे, बालाजी मांदळे, नानासाहेब भिसे, परमेश्वर पानखडे, अण्णासाहेब चौगुले, जयराम लकडे, शहाजी चौगुले, गणेश पानखडे, आदेश वायाळ, आझाद पटेल यांच्यासह भिसे वाघोली आणि त्या परिसरातील भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते सर्व स्तरातील नागरिक यांनी आभार व्यक्त केले.

## जिल्हा क्रीडा संकुलात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट ; मनपाचे अरोग्य विभाग प्रमुख डॉ.भारती लक्ष देतील का ?



लातूर :– लातूर शहरातील जेष्ठ नागरिक, तरुण–तरुणी, पोलीस प्रशिक्षण, एस आर पी प्रशिक्षण हे क्रीडा संकुलात योगासनासह पायपीट करणे, पळणे, व्यायाम करणे विविध प्रकारातील खेळ करणे वगैरे साठी मोठी गर्दी दररोज असते पण या क्रीडा संकुलात मोकाट सैराट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याने पळत्या फिरत्या नागरिकांचा किंवा खेळ खेळत असलेल्यांचा त्या कुत्र्यांनी चावा घेतला तर काय होईल त्यासाठी या जिल्हा क्रीडा संकुलावर आरोग्य सुविधाही नाही पण अशी गंभीर जोखीम असताना मनपाचे आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. शंकर भारती अशा गंभीर विषयाकडे लक्ष घालून, जिल्हा क्रीडा संकुल येथील मोकाट कुत्र्यामुळे सर्व खेळाडूंना अडथळा, भीतीचे वातावरण निर्माण होत असून अशा मोकाट कुत्र्याला पकडून शहराबाहेर पाठवावे व खेळाडूंना अडथळा निर्माण करणाऱ्या कुत्र्यावर कॅचिंग करावे.अशा मागणीचे निवेदन जिल्हा क्रीडा कार्यालयाने मनपाला दिलेले आहे.



## ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप असणारा नेता उपमुख्यमंत्री: तुम्हाला वेदना होत नाहीत का?

नवी दिल्ली, : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका नेत्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्यानंतर त्याच नेत्याला उपमुख्यमंत्री केले. हे पाहून तुम्हाला वेदना होत नाहीत का? असा सवाल 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना केला. केजरीवाल यांनी भागवत यांना पत्र लिहून पाच प्रश्न विचारले आहेत. यामधून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजप सरकारवर निशाणा साधला आहे. तसेच भाजपच्या राजकारणाबद्दल चिंता व्य क्त केली. भाजपचे राजकारण संपूर्ण देशासाठी घातक हे पत्र एका राजकीय पक्षाचा नेता म्हणून नाही. तर देशाचा एक सामान्य नागरिक म्हणून लिहित असल्याचे केजरीवाल यांनी नमूद केले आहे. भाजपचे केंद्र सरकार देशाला ज्या दिशेने घेऊन जात आहे आणि त्यांचे राजकारण संपूर्ण देशासाठी घातक असल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला. असेच चालू राहिले तर आपली लोकशाही संपेल, आपला देश संपेल, असे ते म्हणाले. सरकारे पाडणे लोकशाहीसाठी योग्य आहे का? देशभरात इतर पक्षांच्या नेत्यांना विविध प्रकारचे आमिष दाखवून किंवा ईडी–सीबीआयच्या धमक्या देऊन त्यांचे पक्ष फोडले जात आहेत. इतर पक्षांची सरकारे पाडली जात आहेत. अशा प्रकारे निवडून आलेली सरकारे पाडणे देशाच्या आणि लोकशाहीसाठी योग्य आहे का? कोणत्याही अप्रामाणिक मार्गाने सत्ता मिळवणे, हे तुम्हाला मान्य आहे की आरएसएसला?, असा सवाल त्यांनी भागवत यांना केला. भाजपला योग्य मार्गावर आणण्याची जबाबदारी आरएसएसची आहे. या सर्व चुकीच्या गोष्टी करण्यापासून तुम्ही पंतप्रधानांना कधी रोखले आहे



दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# केशवराव दाते

मराठी रंगभूमीवरील प्रख्यात नट आणि नाट्यशिक्षक म्हणजे केशवराव त्र्यंबक दाते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील अडिवरे या गावी २४ सप्टेंबर १८८९ रोजी झाला. केशवराव अवघे पाच वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. जेमतेम इंग्रजी पाचव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झाल्यानंतर चरितार्थासाठी त्यांनी मुंबई गाठली व तेथे सुरुवातीला एका दवाखान्यात कंपाउंडर म्हणून काम केले. त्यावेळी संगीत नाटकांचा बोलबाला होता. महाराष्ट्र नाटक मंडळींची काही नाटके त्यांनी पाहिली व नाट्यसृष्टीबद्दल आकर्षण वाढू लागले. रंगभूमीवर नट होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात निर्माण झाली. कालांतराने एका ओळखीच्या मध्यस्थीने त्यांनी २० मे १९०७ रोजी महाराष्ट्र नाटक मंडळीत प्रवेश मिळवला. त्यावेळी स्त्रीपात्र पुरुषच करायचे. एका नाट्यसंस्थेच्या 'झुंजारराव' नाटकातील सारजेची भूमिका त्यांना मिळाली व हीच केशवरावांची पहिली भूमिका ठरली. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे 'कीचक वध' हे नाटक रंगभूमीवर वर्ष १९०७ मधे आले. त्या नाटकातील गणपतराव भागवत यांच्या कीचकाच्या भूमिकेमुळे हे नाटक खूपच गाजले होते. कीचकाची पत्नी रत्नप्रभा हिची भूमिका करण्याची संधी केशवरावांना वर्ष १९०८ मध्ये लाभली. नाट्यअभिनेत्याला आपल्या भूमिकेशी कसे समरस व्हायचे याचे धडे त्यांना गणपतरावांचे अभिनयातूनच मिळाले. महाराष्ट्र नाटक मंडळीच्या नाटकांत केशवरावांनी काही स्त्रीभूमिका केल्यानंतर ते नायकाच्या भूमिका करू लागले. 'प्रेमसंन्यास' नाटकातील जयंत, 'सत्वपरीक्षा' नाटकातील हरिश्चंद्र, 'पुण्यप्रभाव' नाटकातील वृंदावन आणि 'विचित्रलीला' नाटकातील विचित्र अशा त्यांनी काही ठळक भूमिका वठविल्या होत्या. वर्ष १९१९ मधे केशवराव महाराष्ट्र नाटक मंडळीचे एक भागीदार झाले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत 'बेबंदशाही' नाटकातील गणोजी शिर्के, 'खडाष्टक' नाटकातील कवीश्वर व 'सवतीमत्सर' नाटकातील राम या भूमिका उत्कृष्ट रीतीने वठविल्या. महाराष्ट्र नाटक मंडळीच्या भागीदारीतून निवृत्त झाल्यानंतर समर्थ नाटक मंडळी व नाट्यमन्वंतर या संस्थांच्या नाटकांत त्यांनी भूमिका केल्या. समर्थ नाटक मंडळीच्या 'आग्र्याहून सुटका' या नाटकातील औरंगजेब आणि नाट्यमन्वंतराच्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकातील मनोहर या भूमिका प्रेक्षकांना खूपच आवडल्या. केशवरावांनी रंगभूमीचे नाट्यशिक्षक म्हणूनही नाव कमावले. बोलपटांच्या आगमनानंतर केशवरावांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. प्रभात फिल्म कंपनीच्या 'अमृतमंथन', 'कुंकू' आणि 'शेजारी' या चित्रपटांत तसेच बाबूराव पेंटर यांच्या 'सावकारी पाश' या चित्रपटात त्यांनी प्रभावी भूमिका केल्या. राजकमल यांच्या 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटातील त्यांची भूमिका बरीच लोकप्रिय झाली होती. व्ही. शांताराम यांच्या राजकमल कलामंदिरात शांताराम यांचे सहकारी आणि सल्लागार म्हणून केशवराव यांनी जबाबदारी पार पाडली. केशवराव चित्रपटसृष्टीत असतानाही त्यांचे नाट्यसृष्टीकडेही लक्ष होते. त्यांनी दिग्दर्शन केलेल्या 'भाऊबंदकी' नाटकाला भारताच्या राजधानीत पहिले पारितोषिक मिळाले. त्यांना १९६४ साली संगीत नाटक अकादमीचे राष्ट्रपतिपदक मिळाले. १३ सप्टेंबर १९७१ रोजी केशवरावांचे निधन झाले.

# बदलापूर एन्काऊंटरचे स्वागतच;अशाच पध्दतीने भ्रष्टाचाऱ्याचे सुध्दा एन्काऊंटर व्हायला हवेत;कारण ते १४० कोटी जनतेचे रक्त पितात.

बदलापूरमधील दोन बालिकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा सोमवारी दिनांक २३ सप्टेंबर २०२४ ला सायंकाळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाला.बदलापूर लैंगिक अत्याचाराचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात पसरले होते व सर्वत्र या घटनेचा निषेध करण्यात आला होता व राज्यभरात या घटनेने संतप्त नागरिकांनी आंदोलन सुध्दा केले होते.या प्रकरणात बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात पोक्साआणि अन्य कलमांतर्गत दोन गुन्हे दाखल केले होते व पोलिसांनी या गुन्ह्यात शाळेतील सफाई कर्मचारी (कंत्राटी) अक्षय शिंदे याला अटक केली होती.या गुन्हेगाराचा सोमवारी पोलिस चकमकीत मृत्यू झाला व सध्याच्या परिस्थितीत यावर पक्ष–विपक्ष मोठ्या प्रमाणात राजकारण करीत असल्याचे दिसून येते.शेवटी गुन्हा हा गुन्हाच असतो. याचे श्रेय राजकीय पुढाऱ्यांनी न घेता पोलिस विभागाला द्यायला हवेत व पुढील जे काही कारवाई होणार आहे किंवा करायची ती कायद्याच्या चौकटीतुन होवू द्यावी यात राजकीय हस्तक्षेप नकोच.आज देशात अनेक बलात्कारी जमानत किंवा पॅरोलवर बाहेर आहेत ही बाब योग्य नाही.देशात लैंगिक अत्याचार, बलात्कारी,अट्टल गुन्हेगार यापेक्षा सर्वात मोठे गुन्हे देशात घर करून बसले आहेत ते गुन्हेगार म्हणजे भ्रष्टाचारी आज देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला मुठभर भ्रष्टाचाऱ्यांनी पोखरून टिकले आहे. आज देशात भ्रष्टाचार येवढा उफाळलेला आहे की गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पित आहे.त्यामुळे यांचा एन्काऊंटर होने अत्यंत गरजेचे आहे.देशात भ्रष्टाचाराची जळे–मुळे सर्वात जास्त राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे पोलिस विभागाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांचा बालबाका होत नाही व कायद्याच्या चाकोरीतून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरूच रहातो.यालाही आश्चर्यच म्हणावे लागेल. आज भ्रष्टाचारी करोडो,अरबो रूपये घेऊन देशांच्या बाहेर फरार होतात.परंतु आपण काहीच करू शकत नाही व हातावर हात ठेवून बसुन राहातो.ही सुद्धा शोकांतिका म्हणावी लागेल.त्याच प्रमाणे देशात आजही राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने व भ्रष्टाचार करून कमविलेली करोडो रूपयांची चल–अचल संपत्ती मोठ्या प्रमाणात आहेत.त्यांच्या सात पीढ्या आरामात बसून खावु शकतात या पध्दतीने संपत्ती जमवीलेली आहे.यामुळे प्रत्येक भ्रष्टाचारी देशाचे मालक समजतात व गरीब,सर्वसामान्यांना हाल–अपेष्टा सहज कराव्या लागतात.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की भ्रष्टाचारी; देशाचे व देशाच्या १४० कोटी जनतेचे सर्वात मोठे गुन्हेगार नाहीत? त्यामुळे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी एन्काऊंटर चांगली पध्दत आहे याचा उपयोग भ्रष्टाचाऱ्यांवर झाला तर देशातील महागाई, बेरोजगारी अवश्य कमी होवून गरीब व सर्वसामान्यांना दिलासा मिळेल आणि देश प्रगतीपथावर येईल.

*******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# अन्य धर्मीयांनी बदलावे मग आम्ही बदलू, यासारखा अविवेक नाही!

नुकतेच दहीहंडी, गणपती उत्सव ढोलताशे, डीजेचा दणदणाट करत वाजत गाजत साजरे झाले. आता नवरात्र, दिवाळी, होळी असे एका मागून एक अनेक सण–उत्सव सुरू होतील. शिवाय लग्न, मुंज, सत्यनारायणाच्या महापूजा, आयपीएल ते आंतरराष्ट्रीय कोणताही सामना जिंकणे, निवडणूक जिंकलेल्या उमेदवाराच्या मिरवणुका, अशी वर्षभर मिळणारी निमित्ते ढोलताशे आणि डीजेना उठाव देतात ते वेगळेच. या सर्व सण आणि कार्यक्रमांमध्ये आपण नेहमीप्रमाणे जनतेच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याची न चिंता न करता मोठ्या प्रमाणात ढोलताशे, डीजे, लेझर या कानठळ्या बसवणाऱ्या आणि दृष्टीदोष निर्माण करणाऱ्या अत्याधुनिक उपकरणांचा उपयोग करत असतोच. त्यामुळे

१) लेझरचा प्रकाश डोळ्यात गेला आणि अंधारी आली. प्रकाशझोतामुळे नेत्रदोष निर्माण होऊन कायमचा आंधळेपणा आला.

२) मूर्ती विसर्जनामुळे तळी, नद्या, समुद्र यांचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले.

३) दहीहंडीत अमुक इतके गोविंदा जखमी झाले वा मृत्युमुखी पडले.

४) डीजेच्या दणदणाटामुळे कान–नाक–घसा तज्ज्ञांकडे येणाऱ्यांची संख्या वाढली. तर काही लोकांना कायमचा बहिरेपणा आला. काही नैराश्यग्रस्त झाले, हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले.

५) नवरात्रात कॉन्डोमची विक्री वाढली आणि त्याचसोबत नंतर काही महिन्यांनी गर्भपातांची संख्याही वाढली, असा डॉक्टरांचा निष्कर्ष आला.

६) विसर्जनाच्या मिरवणुकी चेंगराचेंगरी होऊन काही भक्त दगावले, तर काही नदीच्या वा समुद्राच्या प्रवाहात वाहून गेले.




या बातम्या नित्याचाच होतात. त्या कितीही क्लेशकारक असल्या तरीही अंधभक्तांचा उन्माद आणि उन्मत्तपणा कमी होण्याचे लक्षण दिसत नाही. कारण त्यांच्या मनावर धर्मांधतेचे आणि परधर्म द्वेषाचे गारुड स्वार झाले आहे! रस्ते अडवून ट्रॅफिक जाम करत चित्रपटातील थिल्लर गाण्यांवर आचकट विचकट नाचत मिरवणुका काढणे म्हणजे देवभक्ती प्रदर्शित करणे असेच त्यांना वाटते. त्यामुळे त्यांना कितीही समजावून सांगितले तरी सध्या ते त्यांच्या आकलनापलीकडचे आहे. कारण

आम्ही धार्मिक उत्सवापायी आंधळे, बहिरे, लुळेपांगळे झालो म्हणून काय बिघडले? देवाधर्माच्या रक्षणासाठी प्राण हाती घेऊन लढणारे आम्ही शूरवीर सरदार आहोत! भलेही लेझरमुळे आमची दृष्टी जाईल, त्याची आम्हाला तमा नाही. कारण मुळातच आम्ही आंधळे आहोत. त्यामुळे डोळ्यात रक्त साकळले काय आणि रेटिनाला इजा झाली काय आम्हाला काहीही फरक पडत नाही. अहाहा! काय तो डोळ्यांचे धृतराष्ट्र करणारा लेझर शो!! एवढा नेत्रदीपक आहे की, तो लोकांना दाखवणे आमचे कर्तव्यच नाही का? त्याशिवाय लोकांमध्ये धर्माभिमान जागृत होणार कसा? म्हणून आम्ही आंधळे झाल्यावरही आम्हा तरुणांचे सळसळते रक्त धर्मरक्षणासाठी कायम उसळत राहणार, ही काळ्या दगडावरची रेख आहे! कारण 'आम्ही देवधर्मासाठी प्राण घेतलं हाती, शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती!'

दुसरी गोष्ट, ज्यांना साहसी खेळांतील थरार कल्पनेतसुद्धा करवत नाही त्यांना दहीहंडीतील थरावर थर रचण्यातील थरार कळणे कठीण! साहस म्हटले की, धोका आलाच. पण तरुणाई अशा धोक्यांना सामोरे जाण्यास केव्हाही सज्ज असते. कारण म्हटलेच आहे की, 'हिम्मते मर्दा तो मदद ए खुदा।' मग आम्हाला कसली चिंता? साक्षात देव आमचा पाठीराखा आहे. मग त्या देवाची भक्ती करण्यासाठी आम्ही भलेही दहीहंडीच्या थरावरून खाली पडून लुळेपांगळे झालो, आयुष्यभर आईवडिलांसाठी भार झालो, तरी काही हरकत नाही. शेवटी ज्यांनी आम्हाला जन्म दिला आहे त्यांनीच आमचा भार वाहणे त्यांचे कर्तव्यच नाही का? लोक भलेही म्हणतील की, वंशाचा दिवा आई–वडिलांच्या म्हातारपणाची काठी असतो. पण आम्ही म्हणतो, आम्ही आमचे प्राण देवाधर्मासाठी देण्यास अक्षरशः एका पायावर तयार असल्यामुळे त्यांनीच आमची काठी व्हावे, हेच जास्त योग्य नाही का?

तिसरी गोष्ट म्हणजे संगीताचे माधुर्य कळत नाही अशा अरसिकांना ध्वनिवर्धकाच्या भिंती लावून दणदणाटी आवाजाने देवभक्तीपर गाण्यावर थिरकण्यातली मजा काय कळणार? नाचाने शरीरातील सगळे स्नायू ढिले होतात. अंगाला शिथिलता देणारा हा व्यायाम प्रकार ध्वनी प्रदूषणाच्या नावाने बोंब ठोकणाऱ्या पर्यावरणवाद्यांच्या लक्षात येणे कठीण! त्यांच्या 'अजान'चा बारा महिने आम्ही त्रास सहन करतो; मग आमच्या ढोलताशांचा काही दिवस त्रास सहन केला तर बिघडले कुठे? आणि त्या दणदणाटी आवाजामुळे आमच्यातील काही बहिरे झाले म्हणून काय बिघडले? तसेही नेत्यांच्या आज्ञा बहिरेपणाने डोके गहाण ठेवून पाळणे हे तर आमचे कर्तव्यच आहे. त्यासाठी हा बहिरेपणा आम्हाला मदतच करतो. भारतात तरुण सर्वांत जास्त आहेत. आम्ही तरुण बहिरे आणि आंधळे झालो तर आमच्या राजकारण्यांचा फायदाच नाही का? त्यांच्या भावी पिढ्यांच्या भल्यासाठी आम्ही धर्मरक्षक त्याग करणार नाही तर नेत्यांची मुले करणार? शेवटी आम्हाला काही धर्माभिमान आहे की नाही?

असे उपहासात्मक लिखाण वाचल्यावर काही भक्त चवताळून म्हणतील की, तुम्हाला नेहमी फक्त आपलेच दोष दिसतात काय? कधीतरी 'त्यांच्या'वर टीका करून दाखवा की. तुम्हाला फक्त आपलाच हिंदूधर्म दिसतो काय?' तेव्हा त्यांना एवढेच विचारावेसे वाटते की, 'माझ्या हिंदू धर्मात धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा पसरवणारे आपलेच धर्ममार्तंड, पंडे, पुजारी आहेत की मुस्लीम धर्मातील मुल्ला–मौलवी वा ख्रिशन धर्मातील फादर–पादरी?' लोकांचे शोषण त्यांच्याच धर्मातीलच ढोंगी बाबा–बुवा–महाराज करतात.

दुसरे असे की, आपण हिंदू धर्मात जन्म घेतला आणि लहानपणापासून त्याच धर्मातील अंधश्रद्धा आणि शोषण पाहत आलो आहोत, तर मुस्लीम धर्मातील लोकांवर आणि ख्रिश्चनांवर आपण आधी बोलावे की आपल्याच धर्मातील शोषणकर्त्या धर्ममार्तंडावर? त्यांच्या अंधश्रद्धांवर टीका करण्यासाठी त्यांच्या धर्मातील रॅशनॅलिस्ट लोक आहेतच की. ते त्यांच्या कुवातीनुसार याला वाचा फोडत असतातच. त्यांना जसा त्यांचा समाज सुधारावा असे वाटते तसेच आम्हालाही आपला समाज सुधारावा असे वाटते; यात गैर काय? म्हणून आम्ही आपल्याच धर्मातील अंधश्रद्धांवर जास्त बोलतो.

आता समजा एखादा मुस्लिम आपल्या धर्मातील अंधश्रद्धेवर, शोषणावर बोलला आणि एखादा हिंदू मुस्लीम अंधश्रद्धेवर बोलला तर दोन्हीकडच्यांना चालेल का? दंगली होतील ना! मुस्लिमांनी वा इतर धर्मियांनी हिंदूधर्मावर टीका केली तर त्यांना मोठ्या तोंडाने भक्त गुरकवतात की, 'आम्ही आमचे पाहून घेऊ. आमच्या धर्मात नाक खुपसायची गरज नाही.' म्हणजे त्यांनी केलेली टीका जर आवडत नसेल तर आपल्याला इस्लाम वा इतर धर्मांवर टीका करण्याचा काय अधिकार आहे? थोडक्यात काय तर, माझ्या घरातील कचरा मी दूर करणार की माझा शेजारचा येऊन करणार? माझे घर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी माझी आणि माझ्या कुटुंबातील व्यक्तींचीच असणार ना? हे शेजारच्या अब्दुल चाचाच्या घरी कचरा आहे, तर आपल्या घरातील कचरा कशाला स्वच्छ करता, पडून राहू द्या तसाच, आधी त्यांचा कचरा साफ होऊदे, असे म्हणण्यासारखे आहे.

ते अमुक करतात म्हणून आपणही तसेच करणार? 'ते' अनुकरणीय कधीपासून झाले? इतरांच्या चुका दाखवून आपल्या चुकांचे समर्थन करणे यालाच दांभिक दुटप्पीपणा म्हणतात. मग इतर धर्मियांनी कसेही वर्तन केले तरी ते मान्य करावे का? अजिबात नाही! एक पुरोगामी म्हणून इस्लाम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन धर्मातील असंख्य अनिष्ठ रुढींना ठाम विरोध केलाच पाहिजे. प्रा. नरहर कुरुंदकर, हमीद दलवाई, अनिल अवचट, श्याम मानव तसेच नरेंद्र दाभोलकर यासारख्या समाजवादी पुरोगाम्यांनी तो अनेकदा केलेलाच आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने अनेक आंदोलनेही मुस्लीम बाबाबुवांच्या विरोधात केली आहेत आणि जादूटोणा कायद्याच्या आधारे सर्व धर्मांतील बाबाबुवांना अटकही करण्यास भाग पाडले आहे. त्याच प्रमाणे जावेद अख्तर अनेकदा जाहीररित्या आपण नास्तिक आहोत आणि इस्लामी प्रथा वाईट आहेत, हे सांगतात. म्हणून काही ढोंगी लोकांमुळे पुरोगामित्व बदनाम केले जाऊ शकत नाही, की हिंदू धर्माच्या उन्नतीचा प्रयत्न थांबवता येणार नाही!

तेव्हा 'आम्हाला काय सांगता, इतर धर्मियांना सांगा ना!' असा टाहो फोडणाऱ्यांनी आणि तो फॉरवर्ड करणाऱ्यानी एकदा स्वतःच्या निष्ठा आणि हेतू तपासले पाहिजेत. हिंदूंचा विकास व्हावा, हिंदूधर्मीयांची प्रगती व्हावी असे ज्यांना वाटत नाही, त्यांनी खुशाल असल्या अस्मिता जोपासण्यात धन्यता मानावी. उत्कर्षासाठी पुरोगामित्व हे अटळ आहे! शेवटी 'परिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे.' हे आमची गीता सांगतेच, नाही का?

म्हणून दुसऱ्या धर्मातील व्यक्तीने बदलावे मग आम्ही बदलू, यासारखा दुसरा अविवेकी आग्रह नाही. असे जेव्हा एखाद्या व्यक्ती वा समूहाच्या बाबतीत आपल्याला वाटते, तेव्हा थोडा गृहपाठ करून बघावा. त्या व्यक्ती वा समूहाच्या नेमक्या कुठल्या वागण्यात बदल घडावा असे आपल्याला वाटते त्याची एक यादी करावी, ती यादी तपासून बघावी. हे लक्षात येईल की इतके सगळे बदल त्या व्यक्ती वा समूहाने आपल्याला बरे वाटावे म्हणून करायचे आहेत! त्या व्यक्तीला दोष देणे सोपे आहे. कारण त्या अपेक्षा शेवटी आपल्या आहेत. पण ती व्यक्ती वा समूहही तशाच अपेक्षा बाळगत असेल तर? त्या व्यक्ती वा समूहाने बदलावे म्हणून आपण जी यादी तयार केली तशीच यादी आपण आपल्या व्यक्ती वा समूहासाठी का करू नये? तेव्हा एकमेकांना दोष देण्यापेक्षा प्रत्येकाने आपापल्या धर्मातील दोष नाहीसे करणेच योग्य नाही का?

पण कोणताही बदल स्वीकारण्यासाठी अंगी धाडस लागते आणि विचार करण्याची प्रवृत्तीही जोपर्यंत आपण ती जोपासत नाही तोपर्यंत आपले जीणे हे मेंढरूवृत्तीच्या प्रवाहपतितासारखे गलितगात्र होते. आपल्याला बिनडोक मेंढरू होणे आवडेल की विचारी, विवेकी माणूस, हे आपणच ठरवायचे आहे. ही प्रक्रिया कठीण असली तरी ती आपल्याच हिताची असते.

# नदी काठावरील गावांमध्ये खबरदारीच्या उपाययोजना तातडीने सुरू करा- पालकमंत्री गिरीश महाजन

## 'जिल्ह्यात पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा

लातूर :- जिल्ह्यात २४ सप्टेंबर रोजी झालेल्या पावसामुळे नद्या, सिंचन प्रकल्पात पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे निर्माण होणारी संभाव्य पूर परिस्थिती लक्षात घेवून खबरदारीच्या उपाययोजना तातडीने सुरू करण्याच्या सूचना पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या. जिल्ह्यात पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा त्यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला.

पुराचा धोका असलेल्या गावांमधे प्रशासनाने केलेल्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

तेरणा आणि मांजरा नदीत सुरू असलेला पाण्याचा विसर्ग, तसेच इतर नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याने पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असलेल्या सर्व नद्यांच्या काठावरील गावांमध्ये खबरदारीच्या उपाययोजना तातडीने सुरू कराव्यात. आवश्यकता असल्यास नागरिकांचे तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतरण करून त्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी. कोणत्याही प्रकारची जीवितहानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री श्री. महाजन म्हणाले.

संभाव्य पूर परिस्थिती लक्षात घेवून गावनिहाय शोध पथके, आरोग्य पथके सज्ज ठेवावीत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय यंत्रणा सज्ज ठेवावी. यामध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. गाव ते जिल्हा पातळीवरील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून सातत्याने परिस्थितीचा आढावा घेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात. तलावांची पाणी पातळी, सांडवा, भिंत यावर सातत्याने लक्ष ठेवून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही, याची काळजी घ्यावी, असे पालकमंत्री श्री. महाजन म्हणाले.

**नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत**

जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करावेत. तसेच घरांची पडझड किंवा पशुधनाची हानी झाली असल्यास त्याबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करून बाधितांना मदत उपलब्ध करून द्यावी. पुरामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करावे.

तसेच सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात, असे पालकमंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

पूर परिस्थिती हाताळण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. तसेच सर्व संबंधित अधिकारी यांना प्रत्यक्ष फिल्डवर नुकसानीची व पूर परिस्थितीचा आढावा घेत आहेत. सर्व विभागांच्या समन्वयाने खबरदारीच्या उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी सांगितले.

नदी काठावरील गावांमध्ये दवंडीच्या माध्यमातून नागरिकांना सतर्क करण्यात आले आहे. तसेच पूर परिस्थिती निर्माण झाल्यास बाधित होणाऱ्या कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिली.

# आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित पी.एल.गोविंदवाड यांचा समितीने केला सत्कार




लातूर ---- लातूर शहर पूर्व भागातील जवाहर प्राथमिक विद्यालय लातूर येथील मुख्याध्यापक श्री ,पी.एल.गोविंदवाड सर यांना नुकताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने जाहीर झाल्याने आज लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने संत ज्ञानेश्वर विद्यालयात समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, गौतम ससाणे, यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील कार्याकरिता शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी क्रीडा शिक्षक समाधान बर्गे ,ग्रंथपाल फड सर,यांच्या सह इत्यादींची उपस्थिती होती

# कलावंत शिक्षकांच्या गीत गुंजन कार्यक्रमास उदंड प्रतिसाद..

## अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळाचा उपक्रम




किनवट/शेख शौकत :-येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालयातील सभागृहात अखिल भारतीय शिक्षक साहित्य, कला व क्रीडा मंडळ मराठवाडा विभागाच्या वतीने खास शिक्षकांसाठी कराओके गीत गायनाचा गीत गुंजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास कलावंत शिक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलतांना शिक्षण विस्तार अधिकारी संजय कराड म्हणाले की, संगीत हे असे औषध आहे त्यामुळे दुःख-वेदना दूर होतात. कलावंत शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये रमून जातो. म्हणून शिक्षकांनी आपली आवड जोपासली पाहिजे. शिक्षकांना हा मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळाचे मी कौतुक करतो.

यावेळी आंतरराष्ट्रीय चित्रकार रणजीत वर्मा, किनवट तालुकाध्यक्ष रामस्वरूप मडावी, माहूर तालुकाध्यक्ष मिलिंद कंधारे, प्राचार्य वसंत राठोड, संगीत महाविद्यालयाच्या प्राचार्या आम्रपाली वाठोरे आदीसह अनेक शिक्षक-शिक्षिका उपस्थित होत्या. मराठी हिंदी चित्रपटगीते, देशभक्ती गीते, भावगीते, भक्तीगीते अशा एकापेक्षा एक सरस गीत गायनाने कार्यक्रमाची रंगत वाढली. सहभागी सर्वांना सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुभाषनगर येथील शालेय पोषण आहार कामगाराचा मुलगा आदर्श साहेबराव वाढवे यांची वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी पहिल्याच फेरीमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उत्तम कानिंदे यांनी शिक्षकांना गीत गायनासाठी आधुनिक स्टुडिओ उपलब्ध करून देण्याचे आश्वासित केले. यावेळी गीतगुंजन कार्यक्रमात मुन्ना थोरात, आम्रपाली वाठोरे, सुभाष पडलवार, मिलिंद खंदारे, सतीश राऊत, चंद्रकांत मोरे, उल्हास सुदेगुणेवार, रुपेश मुनेश्वर, दत्ता शेवाळकर, गणेश येरकाडे, रमेश पडगिलवार, संजय जाधव, कुणाल राठोड, सुधाकर नरोटे, बालाजी इंदुरकर, वसंत राठोड, अनिल भंडारे, रणजीत वर्मा, प्रवीण वाघमारे, कामराज माडपेलिवार, गंगाधर कदम, आत्मानंद सत्यवंश, शेख अकबर, रामस्वरूप मडावी, शेषराव पाटील, रमेश मुनेश्वर, शिवशंकर स्वामी, दिलीप कोसले, दीपक डंबाळे, प्रशांत घोडके, साहेबराव वाढवे, भीमराव पाटील, नामदेव डवरे, विश्वास पाटील, गुरुलिंग वाळके, दयाल मोगरकर , चंद्रशेखर शेन्डे आदी शिक्षक कलावंतांनी उपस्थित राहून बहारदार गीते सादर केली.

# राहुल गांधी यांच्या विरोधात धमक्या देणाऱ्यावर गुन्हे दाखल करा,

## तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

किनवट/शेख शौकत :-भाजपा नेते तरविंदरसिंह मारवा, केंद्रीय मंत्री रावनित बिट्टू, राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे, शिवसेना (शिंदे) गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभा विरोधी पक्ष नेते खा. राहुल गांधी यांची हत्या करण्याच्या व जीविताला धोका निर्माण करण्याच्या धमक्या दिलेल्या आहे.



त्यांचे विरोधात सदर दोषीवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावे या मागणीचे निवेदन अ.भा. काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय प्रवक्ते आकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व काँग्रेस कमिटीचे शहर अध्यक्ष गिरीष नेम्मानीवार, व सुभाष नाईक,यांच्या नेतृत्वात सहाय्यक जिल्हाधिकारी कावली मेघना (भा.प्र.से.) यांना उपविभागीय अधिकारी कार्यालयात दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी देण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की, भाजपा आणि त्यांच्या मित्र पक्षाकडून सातत्याने भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पक्षाचे नेते व लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची हत्या करण्याच्या व जीविताला धोका निर्माण करण्याच्या धमक्या दिलेल्या आहेत. तसेच त्यांची जीभ कापण्याच्या धमक्या दिल्या जात आहे व त्यांच्यावर बक्षीस जाहीर केल्या जात आहेत. भाजप नेते तरविंदसिंह मारवा यांनी राहुल गांधी यांची अवस्था त्यांची आजी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रमाणे करू अशी खुलेआम धमकी दिली आहे. तसेच केंद्रीय मंत्री रवनित बिट्टू यांनी दहशतवादी संबोधले आहे, राज्यसभा खासदार अनिल बोंडे खासदार राज्यसभा यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके दिले पाहिजे, असे वक्तव्य केले आहे. तसेच शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास ११ लाख रुपये बक्षीस जाहीर केले आहे. म्हणून मित्रपक्षाचे व भाजप नेते तरविंदसिह मारवा, केंद्रीय मंत्री रवनित बिट्टू, राज्यसभा खासदार अनिल बोंडे, शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड या चौघांवर गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे किनवट तालुका व शहर कांग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. राहूल गांधी यांची हत्या करण्याची धमकी देणाऱ्या घटनेचा काँग्रेस तालुका व शहर कमिटीच्या वतीने पक्ष कार्यालयात जाहीर निषेध करण्यात आला. निवेदनावर अ.भा. काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय प्रवक्ते आकाश जाधव, शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष गिरीष नेम्मानीवार, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, सुभाष बाबू नाईक,सिराज जिवाणी, इमरान शेख, अभय महाजन, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, खालेद भाई, सत्तार खिची, के. स्वामी, लुखमान शेख, शेख मुजाहिद, अलिमोद्दीन सिद्दीकी, शेख रहीम, सय्यद अनवर, शमशेर खिची, शेख जाफर चिखलीकर, माधव खेडकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सिद्धार्थ साळवी यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती



नवी मुंबई / प्रतिनिधी :- आंबेडकरी चळवळीचे प्रबोधनकार,सुप्रसिद्ध कवी गायक आयु.सिद्धार्थ साळवी यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड झाल्यामुळे आनंदाचे वातावरण आहे. गेली वीस वर्षे आंबेडकरी चळवळीत निस्वार्थी पणे काम करीत असताना,त्यांच्या वक्तृत्वाची आणि कार्याची दखल घेऊन शिवसेना उपनेते सन्मा. विजय नाहटा साहेब यांनी त्यांना शिवसेना पक्षात प्रवेश देऊन उपशहरप्रमुख पद देऊन जनसेवा करण्याची संधी दिली,कमी अवधी मध्ये साळवी साहेबांनी वरिष्ठांना आपल्या कामकाजाची पोच पावती दिली, कोणतेही काम करताना त्यांची चिकाटी दिसून येते. जुईनगर ठिकाणी बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र ८२८ ते सचिव असून विभागामध्ये अनेक कार्यक्रम करून समाजहित जपण्याचे कार्य करीत आहेत. त्यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड झाल्या बद्दल त्यांनी सन्मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब तसेच उपनेते सन्मा. विजय नाहटा साहेब यांचे आभार प्रकट केले आहेत. आपल्या हातून निस्वार्थी जनसेवा घडेल असा विश्वास व्यक्त केला आहे,त्यांच्या निवडीमुळे विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सलग दुसऱ्यांदा अश्विन भोसले यांचे तंटामुक्ती अध्यक्ष पदी निवड.








चाकूर / प्रतिनिधी :- तालुक्यातील हाळी खुर्द येथील ग्रामपंचायतच्या महात्मा गांधी तंटामुक्ती समितीच्या अध्यक्ष पदाची नुकतीच निवड करण्यात आली.


सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर असणारे युवक नेतृत्व अश्विन भगवानराव भोसले यांना ओळखले जाते. मागील वर्षे सर्वानुमते बिनविरोध भोसले यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. सन २०२४-२५ च्या अध्यक्ष पदासाठी ग्रामसेवक रविंद्र क्षीरसागर सरपंच प्रचीता संजय भोसले ,उपसरपंच रमेश शिंदे , ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत निवड अध्यक्ष पदी अश्विन भगवानराव भोसले तर उपाध्यक्षपदी निवृत्ती चामले यांची करण्यात आली. प्रसंगी बाबू सय्यद, इमाम भाई डागवाले, इंदुबाई भालेराव, ललिता भोसले, गणेश जाधव, प्रयागबाई नरहारे, हलिमाबी पटेल , सोसायटीचे चेअरमन जलील पटेल, पोलीस पाटील साहेबराव पाटील, बीट जमादार गोविंद बोळंगे, रवी वाघमारे तलाठी रोहिणी गायकवाड, कृषी सहाय्यक सचिन पंडगे, शालेय समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार शिंदे यांची उपस्थिती होती. निवडबद्दल गजानन शिंदे, शशिकांत शिंदे , बाळू चांगले कमलाकर पाटील काशीम पटेल सलीम शेख, यशवंत कर्डिले , सचिन कर्डिले, शरद पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# या समुद्रात कोणीही बुडू शकत नाही, येथील पाणी आहे लोकांसाठी वरदान, दूर करते अनेक रोग

समुद्र जितका सुंदर दिसतो तितकाच तो धोकादायक देखील असतो. देशात आणि जगात अनेक समुद्रकिनारे आहेत. अनेक लोक सुट्टीत समुद्र किनाऱ्यांना भेट द्यायला जात असतात. मात्र बऱ्याचदा त्यांना समुद्रापासून आणि त्याच्या लाटांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो. कोणी बुडू नये म्हणून असे म्हटले जाते. दुसरीकडे, जगात एक असा महासागर आहे जिथे माणूस इच्छा असूनही बुडू शकत नाही. तुमचा विश्वास बसत नसला तरी हे सत्य आहे. चला आज या समुद्राविषयी सविस्तर काही रंजक गोष्टी जाणून घेऊयात. कुठे आहे हे समुद्र? आपण ज्या समुद्राबद्दल बोलत आहोत त्याला 'डेड सी' म्हटले जाते. हा समुद्र जगभर प्रसिद्ध आहे. हा समुद्र जॉर्डन आणि इस्रायलच्या मध्ये वसलेला आहे. या समुद्रात जो जातो तो बुडत नाही तर पाण्याच्या वर तरंगू लागतो. आपल्या याच गुणामुळे हा समुद्र जगभर प्रचलित आहे.

काय आहे 'डेड सी' समुद्रात? आपल्या सर्वांना माहित आहे की समुद्राचे पाणी खारट असते कारण त्यात मीठ असते. डेड समुद्राचे पाणी देखील खारट आहे, परंतु ते उर्वरित समुद्रापेक्षा बरेच वेगळे आहे. इतर समुद्रांच्या तुलनेत डेड सी'चे पाणी जास्त खारट आहे, कारण या समुद्रात झिंक, सल्फर, मॅग्नेशियम, पोटॅश, ब्रोमाइड आणि कॅल्शियम सारखी खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात. लोक 'डेड सी' मध्ये का डुबत नाहीत? डेड समुद्रात





कोणीही मनुष्य बुडत नाही ते पाण्याच्या वर तरंगत राहतो. यामागे वैज्ञानिक कारण आहे. वास्तविक डेड समुद्र हा जमिनीने वेढलेला आहे आणि पृथ्वीवरील सर्वात खालच्या दरीत आहे. किंवा त्याऐवजी, ते समुद्रसपाटीपासून सुमारे १३८८ फूट खाली आहे, जे पृथ्वीवरील सर्वात कमी बिंदू मानले जाते. या समुद्राची घनता १.२४ किलो/लिटर आहे, त्यामुळे येथील पाणी पोहण्यासाठी योग्य आहे आणि येथे कोणीही बुडत नाही. 'डेड सी' मध्ये जाताच दूर होतात रोग 'डेड सी' हे नाव ऐकून जणू काही समुद्र तुम्हाला मारून टाकेल असे वाटते, मात्र तसे नाही. डेड सी अनेक लोकांसाठी एक वरदान आहे, कारण त्याचे पाणी अनेक रोग बरे करण्यास सक्षम आहे. शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासानुसार, जो कोणी या समुद्राच्या पाण्यात स्नान करतो त्याच्या त्वचेशी संबंधित सर्व रोग बरे होतात. या समुद्राचे क्षार जरी मानवासाठी योग्य नसले तरी येथील पाणी मानवासाठी अत्यंत फायदेशीर ठरले आहे. लोकांना हे समुद्राचे पाणी तोंडात न घेण्याचा सल्लाही दिला जातो, त्यामुळे त्यांच्या हृदयाला आणि किडनीला इजा होऊ शकते.

# प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आयोजित सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या आक्रोश मोर्चास उत्स्फूर्त प्रतिसाद

## मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करू : निमंत्रक लायक पटेल

प्राथमिक शिक्षक संघटनेच्या या मोर्चाला भेट देऊन आ. अमित देशमुख यांनी संबोधित केले. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास मंत्री मंडळाच्या पहिल्याच बैठकीत प्राथमिक शिक्षक संघटनेच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या जातील, असे आश्वसनही आ. अमित देशमुख यांनी दिले. रजा घेऊन प्राथमिक शिक्षक संघटनेने काढलेला हा आक्रोश मोर्चा पाहून महायुती सरकारलाच आता सक्तीच्या रजेवर पाठविण्याची वेळ येऊन ठेपल्याचे त्यांनी बोलून दाखविले . आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात नक्कीच परिवर्तन घडेल आणि आपणा सर्वांच्याही जीवनात परिवर्तन घडेल अशा भावनाही आ. देशमुख यांनी यावेळी व्यक्त केल्या.





लातूर : विद्यार्थी व शिक्षक यांच्यावरील संचमान्यते बाबतचा दि. १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय तसेच कंत्राटी शिक्षक भरतीचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा या प्रमुख मागण्यांसह राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी बुधवारी, दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी लातूरच्या जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या आक्रोश मोर्चास अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, शिक्षण, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाकडून सतत दुर्लक्ष्य होत आहे. सोबतच शिक्षण हक्क कायदा – २००९ मधील तरतुदीस विसंगत दि. १५ मार्च २०२४ व दि. ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे अस्तित्वच संपणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण संपविण्याचे धोरण अलीकडे घेतलेल्या शासन निर्णयामुळे अधोरेखित झाले आहे. राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या प्रलंबित मागण्यांच्या सोडवणुकीच्या दृष्टीने शासन स्तरावरून कोणतीही अनुकूल भूमिका घेतली जात नाही. प्राथमिक शिक्षक संघटनांशी चर्चा करून प्रश्न समजून घेऊन त्यावर अनुकूल निर्णय घेण्याच्या बाबतीत प्रचंड उदासीनता असल्याचे निदर्शनास आल्यानंतर दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी लातुरात पार पडलेल्या निर्धार बैठकीतील ठरावानुसार हा प्रचंड चा काढण्यात आला. लातूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, टाऊन हॉल येथून या मोर्चास सुरुवात झाली. मोर्चात सहभागी शिक्षक प्रतिनिधींच्या हाती आपल्या मागण्यांचे तसेच त्याच्या पूर्ततेचे फलक सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते. अत्यंत शिस्तबद्धरीत्या निघालेल्या या मोर्चाचे नेतृत्व शिवाजीराव साखरे, दामाजी बालुरे , कालिदास माने, , संतोष पिट्टलवाड, निमंत्रक लायक पटेल यांसह जिल्ह्यातील संघटनेच्या ज्येष्ठ नेत्यांनी केले. मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात आम्हा शिक्षकांना फक्त शिकवू द्या, दि. १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा, २० किंवा २० पेक्षा कमी पट संख्येच्या शाळांच्या बाबतीत कार्यरत शिक्षकाचे एक पद रद्द करण्याचा आणि कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त व अन्य नियुक्ती देण्याचा दि. ५ सप्टेंबर २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा, दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, विद्यार्थी आधार कार्ड संबंधाने असणाऱ्या वास्तव अडचणी लक्षात घेऊन आधार कार्ड आधारित शिक्षक पद निर्धारण धोरण रद्द करावे, सातव्या वेतन आयोगातील पदवीधर शिक्षकांच्या व वरिष्ठ वेतनश्रेणी धारक शिक्षकांच्या वेतन त्रुटीचा निर्णय मार्गी लावावा, दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात निघालेल्या जि . प. शिक्षकांना १९८२ ची पेन्शन आदेश निर्गमित करावेत, शैक्षणिक – अशैक्षणिक कामाच्या शासन निर्णयात शिक्षक संघटनांशी चर्चा करून दुरुस्ती करावी , जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी निवासाची सक्ती रद्द करावी, बीएलओ कामातून सर्व शिक्षकांना कार्यमुक्त करावे, जिल्हा परिषद अंतर्गत सर्व प्रमोशन तात्काळ द्यावेत, लातूर जिल्ह्यातील जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार गेल्या दोन वर्षांपासून रखडलेले आहेत, ते लवकरात लवकर वितरित करण्याचे नियोजन करावे, लातूर जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२३ – २४ संच मान्यतेतील त्रुटींची दुरुस्ती करूनच समायोजन करण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे. मोर्चा जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयावर गेल्यानंतर अनेक शिक्षक नेत्यांनी मोर्चात सहभागी झालेल्या शिक्षक – शिक्षिकांना संबोधित केले.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या या निवेदनावर शिवाजीराव साखरे, दामाजी बालुरे , कालिदास माने , गौतम टाकळीकर, संतोष पिट्टलवाड , निमंत्रक लायक पटेल, अरविंद पुलगुर्ले, डी.बी. गुंडरे , किशन बिराजदार, राजाभाऊ सोमवंशी, मच्छिंद्र गुरमे , विजयकुमार पिनाटे, धनंजय उज्ञनकर, राहुल गायकवाड, परमेश्वर बालकुंडे, सुभाष केंद्रे, जी.टी. होसूरकर, आण्णा नरसिंगे, शरद हुडगे, अप्पाराव शिंदे, अरुण साळुंके, सुभाष मस्के, सुनील हाके, प्रल्हाद इगे , केशव गंभीरे , महादेव खिचडे , गोपाळ पडिले, रमेश गोमारे, गोविंद हंद्राळे, व्यंकूराम उगिले , माधव अंकुशे , आनंद जाधव, तानाजी सोमवंशी, मनोज बनकर , दयानंद बिराजदार, नागसेन कांबळे, माधव गित्ते, लक्ष्मण दावणकर , ज्ञानेश्वर जाधव, दिनेश कांबळे, मंगेश सुवर्णकार, मुनिरखान पठाण, बाळासाहेब कदम, सलीम पठाण, जी.पी. कादरी, सचिन मुर्के , चंद्रशेखर शिरूरे , हिरालाल पाटील, जे.जे. गायकवाड, राम गिल्डा, जी.व्ही. माने, मोहन हाके, शिवचंद्र पांचाळ, फजल काझी, वजीर बागवान, इस्माईल शेख, रमाकांत कराड, सचिन साबणे, बाळासाहेब येळापूरे, रवी भोसले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या निवेदनाच्या माहितीस्तव प्रति मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शिक्षण आयुक्त, मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद लातूर, पोलीस अधीक्षक, शिक्षण उपसंचालक , शिक्षणाधिकारी ( प्राथमिक व माध्यमिक ) यांनाही देण्यात आल्या असल्याची माहिती मोर्चाचे निमंत्रक व राज्य सरचिटणीस लायक पटेल यांनी दिली. तसेचसंघटनेच्या मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही लायक पटेल यांनी दिला आहे.

# मायाताईचे कुशल नेतृत्व व दीक्षाभूमी आंदोलन



नागपूर/ प्रतिनिधी :– घटना किती चांगली असली तरी तिची अंमलबजावणी करणारे नालायक असले तर त्यांना वटणीवर आण्यासाठी जन आंदोलन करावे लागते.जन आंदोलन हे एका दिवसाचे नसते तर समस्या सोडविण्यासाठी सतत पत्रव्यवहार करावा लागतो. प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटून समस्या समजावुन सांगीतली पाहिजे.त्यासाठी भेटून चर्चा करण्याची आवश्यकता असते. दीक्षाभूमी खड्डे बुजविण्यासाठी अनेक स्वयंम घोषित संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष यांनी मोर्चे आंदोलन करून सरकारला धमक्या दिल्या इशारे दिले.पेपर मध्ये फोटोसह बातम्या प्रसिद्ध केल्या.पण पुढे काय केले.माहिती नाही.पण योग्य तो पत्र व्यवहार आणि पाठ पुरवठा केला तो दीक्षाभूमी दक्षता समितीने याच दीक्षाभूमी जन आंदोलनातुन मायाताई उके यांचे कुशल नेतृत्व पुढे आले.


दिक्षाभूमी अंडर ग्राउंड पार्किंग व्यवस्थेसाठी खोदलेले खड्डे नऊ महिन्याने दक्ष नागपुरातील भिमसैनिक,अनुयायी,धम्म उपासक उपासिकांना यांना दिसले. त्यानंतर जन आंदोलनाची शक्ती प्रदर्शन स्पर्धा सुरु झाली.त्यात किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब यांनी धम्म उपासिका महिलांना संघटीत करून दीक्षाभुमी दक्षता समिती स्थापन केली. दीक्षाभुमी दक्षता समितीचे अध्यक्ष मायाताई उके यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसोबत सतत पत्रव्यवहार करून पाठ पुरवठा केला. त्याचा परिणाम झाला की नाही हे पाहण्यासाठी त्यांनी दीक्षाभूमी परिसराचा सर्वे केला. व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकातील पुतळ्यास व अस्तिस पुष्प अर्पण करून वंदना घेतली. दीक्षाभूमी आता धम्मचक्र परिवर्तन दिन सोहळा आयोजित करण्यासाठी तयार झालेली आहे. तरीसुद्धा त्यांनी शासनाला निवेदन केला आहे की खड्डे बुजले परंतु सर्व ठिकाणी माती आहे पाऊस जर आला तर त्या ठिकाणी दलदल निर्माण होऊ शकते, म्हणून शासनाने या ठिकाणी काँक्रेटिंग करावे. यासाठी प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण देशमुख साहेब यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

बजाज नगर पोलीस स्टेशनचे निरीक्षक राजपूत साहेब यांनी दीक्षाभूमी परिसरामध्ये शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सहकार्य केले व धम्मचक्र परिवर्तन दिन सोहळ्याचे कशाप्रकारे व्यवस्था राहील यावर चर्चा केली.त्यांचा ही दीक्षाभूमी दक्षता समितीने पुष्पगुछ देऊन सत्कार केला.यावेळी दीक्षाभूमीवर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मायाताई उके यांना पंचशील शार्प व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. याप्रसंगी किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब,पोर्णिमा शेंडे,सुनिता रंगारी,सुषमा भोवते नानवटकर,रंजना गणवीर,वैशाली रामटेके, उषा उपरे,शोभा अंबादे,रामटेके सर इत्यादी मोठ्या प्रमाणात दीक्षाभूमी दक्षता समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मनपा ॲक्शन मोडवर !

## अतिवृष्टीनंतर पालिकेची यंत्रणा गतिमान अवघ्या कांही तासात परिस्थिती नियंत्रणात मनपा अधिकारी 'ऑनफील्ड'





लातूर/प्रतिनिधी:– मंगळवारी पहाटे व सायंकाळी शहरात जोरदार पाऊस झाला. यानंतर शहरातील सखल भागात पाणी साठले. कांही घरातही पाणी शिरले होते.यानंतर मनपाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी रवाना होत उपाययोजना केल्या व परिस्थिती पूर्वपदावर आणली.

मंगळवारी पहाटे व सायंकाळी ५ ते ७ या कालावधीत शहरात जोरदार पाऊस झाला. यामुळे इस्लामपुरा,कॉइल नगर,नांदगाव वेस,डी मार्ट परिसर,रिंग रोड,राजीव गांधी चौकातील सह्याद्री हॉस्पिटल,विराट हनुमान, सौभाग्य नगर,रामरहीम नगर,उस्मानपुरा,नाना नानी पार्क या भागात पाणी साठले.इस्लामपुरा येथील २०,उस्मानपुरा भागात १० आणि तुळशीधाम परिसरातील ८ ते १० घरात पावसाचे पाणी शिरले होते.

याची माहिती मिळताच मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणे मार्फत ३ अग्निशमन वाहने व २ इंजिन तसेच स्वच्छता विभागाचे ३ इंजिन व ६ जेसीबी मार्फत पाणी काढून देण्याची कार्यवाही करण्यात आली.अनेक ठिकाणी जेसीबीद्वारे पाण्याला रस्ता करून देण्यात आला.काही ठिकाणी इंजिन वापरून घरातील पाणी नाल्यात सोडण्यात आले.

मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी रात्रभर 'ऑन फिल्ड' होते. आयुक्तांनी आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सुचना केल्या. ज्या भागातून नागरिकांचा दूरध्वनी आला त्या भागात तात्काळ अधिकारी व कर्मचारी पाठविले जात होते.यामुळे साठलेल्या पाण्याचा लवकर निचरा करून परिस्थिती पूर्वपदावर आणणे शक्य झाले.

आपत्तीच्या काळात नागरिकांना पालिकेस माहिती देता यावी यासाठी मनपात आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत आहे.आपत्तीच्या काळात नागरिकांनी ०२३८२–२५५५८५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा तिरंगा मंत्रालयावर फडकवण्यासाठी कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी सक्रिय होऊन काम करावे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

## लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक आमदार आर.ए.वसंतकुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर जिल्हा व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक संपन्न




लातूर / प्रतिनिधी :– महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीची रणधूमाळी आता सुरु होत आहे. या निवडणुकीत काँग्रेसचा तिरंगा मंत्रालयावर फडकवण्यासाठी सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी सक्रिय होऊन काम करावे, असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक आमदार आर. ए.वसंतकुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे लातूर जिल्हा व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार त्र्यंबक भिसे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, सरचिटणीस मोईज शेख, सचिव अभय साळुंके, लातूर जिल्हा काँग्रेज कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॾ किरण जाधव, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शिलाताई पाटील, लातूर शहर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा स्मिता खानापुरे, माजी नगराध्यक्षा उषाताई कांबळे, माजी महापौर दिपक सुळ, एकनाथ पाटील, व्यंकटेश पुरी, इम्रान सय्यद, विजयकुमार साबदे, प्रा.प्रविण कांबळे आदीसह काँग्रसचे सर्व फ्रंटलचे अध्यक्ष,सर्व तालुका अध्यक्ष, पदधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकांची रणधूमाळी सुरु होत आहे, येणाऱ्या काळात काँग्रेसचा तिरंगा मंत्रालयावर फडकेल आपणाला काँग्रेस पक्षाला आणखी पुढे घेवून जायचे आहे. मागील विधानसभा निवडणूकीत लातूर शहर व लातूर ग्रामीण विधानसभेच्या जागा काँग्रेसने जिंकल्या पण निलंगा व औसा विधानसभा जिंकता आल्या नाहीत, याचे आम्हाला दु:ख आहे. अहमदपूर व उदगीर विधानसभेच्या जागा ही काँग्रेसला मिळाल्या पाहिजेत. महाविकास आघाडीत महाराष्ट्रातील सर्व समाजाला प्रतिनिधीत्व दिले जाते बारा बलुतेदारांनाही निवडणूकीत संधी दिली जाईल. उदगीरमध्ये काँग्रेसची ताकद जास्त आहे अहमदपूर विधानसभेची जागा ही काँग्रेस पक्षाला सोडावी लातूर जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला जास्तीत जास्त विधानसभेच्या जागा मिळाल्या पाहिजेत असे, त्यांनी सांगितले. पुढे बोलतांना ते म्हाणाले की, मराठवाड्यात सहा जागा एससीच्या राखीव आहेत त्या एससी मधील जातींना सम प्रमाणात मिळाल्या पाहिजेत. काँग्रेस महाविकास आघाडी म्हणून आपल्याला निवडणूका लढवाव्या लागतील, जसजसे निवडणूका जवळ येतील तसतसे तणाव वाढवले जात आहेत हिंदू मुस्लीम धर्मात भांडणे लावण्याचा प्रयत्न महायुती मधील नेते करत आहेत, याची आम्ही निंदा करतो. महाराष्ट्राने जाती धर्माच्या राजकारणाला नेहमी नाकारले आहे, लातूरात हिंदू मुस्लीम शिख ईसाई गुण्या गोविंदाने राहतात विरोधकांचा मत विभाजन करण्याचा प्रयत्न काँग्रेस कार्यकर्त्यांनी हाणून पाडावा, राज्यात महाविकास आघाडीची हवा आहे. मराठवाड्यात सर्वाधीक जागा विधानसभेच्या महाविकास आघाडीच जिंकेल त्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आपआपसातील मतभेद बाजूला ठेवून आतापासूनच एक दिलाने कामाला सुरुवात करावी, असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील प्रगतशील राज्य आहे, मुंबई ही देशाची आर्थीक राजधानी आहे महाविकास आघाडी सरकारने कोराना काळात चांगले काम करुन करोडो लोकांना मदत केली, महायुती सरकारच्या काळात बेराजगारी महागाई वाढत चालली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत, राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच राज्यातील उद्योग दुसरीकडे जात आहेत हे महायुती सरकार लोकांच्या हीताचे काम करीत नाही असे ते म्हणाले. लातूर लोकसभा मतदार संघाचे काँग्रेसचे निरीक्षक आमदार आर. ए.वसंतकुमार म्हणाले की लातूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक काँग्रेस पक्षाने विक्रमी मताधिक्याने जिंकली त्याबद्दल सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो येत्या विधानसभा निवडणूकीची तयारी आपणाला आत्तापासूनच करायची आहे. महाराष्ट्र राज्यात काँग्रेस शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांचे महाविकास आघाडी गठबंधन आहे जेथे जो पक्ष मजबूत असेल तेथील विधानसभेची जागा त्या पक्षाला मिळेल असे त्यांनी सांगितले पुढे बोलतांना ते म्हणाले की, परिणामकारक काम करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्याला संधी दिली जाईल. काँग्रेस कार्यकर्त्यांनी देश राज्य व जिल्ह्यातील स्थानीक समस्यावर जनतेत जाऊन चर्चा करावी. कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने जनतेला पाच गॅरंटी दिल्या तशा गॅरंटी महाराष्ट्रातील जनतेला आम्ही देऊ लातूर लोकसभा मतदार संघात काँग्रेस पक्ष मजबूत आहे जिल्हयातील विधानसभेच्या जास्तीत जास्त जागा काँग्रेसला सोडवून घेवू. देशात सध्या चर्चा होत आहे की, महाराष्ट्र राज्यात काँग्रेस महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे काँग्रेसचा मुख्यमंत्री होणार आहे तसे झाल्यावर देशातील मोदी सरकार सत्तेवर राहणार नाही कारण ते बहुमताचे सरकार नाही तर ते तुकडे तुकडे गँगचे सरकार आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी ड.समद पटेल, विजय देशमुख, सुभाष घोडके, प्रवीण सूर्यवंशी, सचिनबंडापल्ले, रविशंकर जाधव, अनिल चव्हाण, ड.देविदास बोरुळे पाटील, आयुब मणियार, बालाजी साळुंके, बाळासाहेब देशमुख, गणेश देशमुख, रामराजे काळे, रमेश सूर्यवंशी, मारोती पांडे, सिराजउद्दीन जहागीरदार, मुकेश राजमाने, अहमदखा पठाण, डॉ. दिनेश नवगिरे, अमर मोरे, शरद देशमुख, सुंदर पाटील कव्हेकर, संजय जगताप, अमित जाधव, दगडूप्पा मिटकरी, नागसेन कामेगावकर, अक्षय मुरुळे, तबरेज तांबोळी, सुलेखाताई कारेपूरकर, ड. सुनंदा इंगळे, ड सुनीत खंडागळे, अभिजित इगे, अभिषेक पतंगे, महेश कोळे, खाजामिया शेख, युसूफ बाटलीवाला, सागर मुसंडे, ड. गोपाळ बुरबुरे, विष्णुदास धायगुडे, विजय टाकेकर, अमोल गायकवाड, धनराज गायकवाड, पिराजी साठे, ड. विजय गायकवाड,ड. अंगद गायकवाड, राहुल डूमणे मंगेश वैरागे,गिरीश ब्याळे,सचिन कोतवाड,शफी शेख उपस्थित होते. आढावा बैठकीचे प्रास्तावीक लातूर शहर जिल्हा कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे यांनी केले तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर सरचिटणीस मोईज शेख, सचिव अभय साळुंके,एकनाथ पाटील यांनी मनोगत व्यक्त केले या बैठकीचे सुत्रसंचालन प्रा. ओमप्रकाश झुरळे यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE